# <u>जाहीर निवेदन</u>

बृहन्मुंबईतील बंद/आजारी १८ गिरण्यांच्या जागेवर बांधण्यात आलेल्या सदनिकांच्या दिनांक २८/०६/२०१२ रोजी झालेल्या संगणकिय सोडतीमधील यशस्वी ठरलेल्या मयत गिरणी कामगारांचे वारसांना अथवा यशस्वी गिरणी कामगाराचा मृत्यु झाला असल्यास त्यांचे वारसांना **महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र.बैठक २०११/प्र.क्र.३८४/भाग-४/पूर्बा-३/गृनिप दि.०३/०८/२०१३** रोजी च्या परीपत्रकान्वये सादर करणेकरीता कळविण्यात आलेले वारस उत्तराधिकार प्रमाणपत्र (Succession Certificate) **महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र.बैठक २०११/प्र.क्र.३८४/भाग-४/पूर्बा-३/गृनिप दि.१५/०३/२०१३** अन्वये रद्द करण्यात आले आहे. त्याऐवजी अर्जदारांनी सादर करावयाची कार्यवाही, कागदपत्रांची माहिति व प्रारुप मसुदा म्हाडा संकेत स्थळ www.mhada.maharashtra.gov.in येथे प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी सोडतीमधील यशस्वी ठरलेल्या मयत गिरणी कामगारांचे वारसांना अथवा यशस्वी गिरणी कामगाराचा मृत्यु झालेल्या अर्जदाराच्या वारसदारांना सुचित करण्यात येते की, त्यांनी म्हाडा संकेतस्थळावर नमुद सुचनांप्रमाणे पुढील कार्यवाही करुन संबंधीत प्राधिकृत अधिकारी यांचेकडे कागदपत्रांची पूर्तता करावी जेणेकरुन सदनिका वितरणाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

कागदपत्रांच्या छाननीमध्ये प्रथमदर्शनी अपात्र ठरलेल्या अर्जदारांची यादी म्हाडा संकेत स्थळ www.mhada.maharashtra.gov.in येथे प्रसिध्द करण्यात येत आहे. अशा अर्जदारांना सुचित करण्यात येते की, अपात्रतेच्या निर्णयावर अपिल सादर करावयाचे असल्यास त्यांना अपात्रतेच्या सुचनापत्रामध्ये नमुद करण्यात आलेल्या अपिल अधिका-यांकडे विहित मुदतीमध्ये अपिल दाखल करावे.

मुख्य अधिकारी<br>
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई.